# गायनाचार्य पंडित केशवबुवा इंगळे

श्रीकान्त यशवन्त वाघ



पुण्यात सध्याच्या बालगंधर्व पुलासमोर, काँग्रेस हाऊसजवळ माधव संगीत विद्यालयाचे उद्घाटन महर्षी कर्व्यांनी १९५० साली केले. या विद्यालयाचे संचालक कै. पं. केशवबुवा इंगळे (१९०९-१९६७) हे त्याआधी इचलकरंजी संस्थानातील

दरबार गायक होते. संस्थाने विलीन झाल्यानंतर त्यांनी आपला मुक्काम पुण्यास हलवला.

कै. केशवबुवांचे वडील पं. गुंडोबुवा व आजोबा पं. भिकुबुवा हे दोघेही औंध व सांगली संस्थानचे दरबार गायक होते. पं. गुंडोबुवा इंगळे हे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे पट्टशिष्य तसेच विष्णु दिगंबर पलुस्करांचे सहाध्यायी होते. केशवबुवांचे गायनाचे शिक्षण वडिलांकडेच झाले.

ग्वाल्हेर गायकीच्या परंपरेतील त्या काळातील गायकांमध्ये केशवबुबांना मानाचे स्थान होते. त्यांचा आवाज मेहनतीने कमावलेला, गोल, बुलंद व पहाडी होता. ते ग्वाल्हेर पध्दतीनेच मोकळ्या आवाजात बंदिस्त गात असत. आधी संपूर्ण चीज म्हणून मध्यलयीतील बोलआलाप व बोलताना ते तयारीने गात. नियमित व भरपूर रियाजाने आवाजाची झेप व दर्जा उत्तम होता तसेच स्वरही ताकदवान असत. अनवट अथवा मिश्र रागांपेक्षा शुध्द रागच गाण्याकडे त्यांचा जास्त कल होता. लयीच्या पक्केपणामुळे झुमरा, तिलवाडा अशा तालांमध्ये फार सहजतेने गात असत. वेगवेगळ्या ढंगाच्या अनेक चीजाही त्यांना पाठ होत्या.

शिकवण्यापुरता तबला तसेच सतार, दिलरूबा अशी वाद्येही ते वाजवीत. रियाजही स्वतःच डग्ग्यावर ताल धरून करीत असत.

दरबार गायक असताना तसेच नंतर पुण्यास आल्यावरही त्यांच्या इतरत्र अनेक ठिकाणी मैफिली होत होत्या. अजमेर, उज्जैन, नाशिक, ग्वाल्हेर, सोलापूर, लखनौ, जालंदर, मुंबई वगैरे ठिकाणी परिषदांमध्ये व जलशांमध्ये त्यांच्या गायनाचे कौतुकही पुष्कळ झाले. १९३५ साली म्हैसूरच्या नरेशांनी खूष होऊन तीनशे रूपये बक्षीस दिले होते. १९३८ साली पूर्व आफ्रिकेतही त्यांचे जलसे झाले होते. वेगवेगळ्या नभोवाणी केंद्रांवरही त्यांचे सुमारे पाऊणशे कार्यक्रम झाले. १९५३ साली ऑडिशन टेस्टच्या निषेधार्थ त्यांनी आकाशवाणीवर बहिष्कार घातला. पुढे तडजोड होऊन त्यांना त्या टेस्टमधून वगळण्यात आले व पुन्हा त्यांचे आकाशवाणीवर गायन सुरू झाले.

ते स्वतः गांधर्व मंडळाचे संगीत प्रवीण (डॉक्टरेट) होते. संगीताच्या अनेक परीक्षांचे ते परीक्षक असत. त्यांनी वेगवेगळ्या परिषदांमध्ये निबंध वाचले तसेच

नियतकालिकांमधूनही पुष्कळ लिहिले. संगीत कलाविहार मासिकातली त्यांची 'ख्याल गायकीची विशिष्ट अंगे' ही लेखमाला तेव्हा विशेष गाजली (१९५२-५४). काही पुस्तकेही त्यांनी लिहिली. त्यांपैकी 'गीत बोधिनी' (भाग १) हे पुस्तक वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९५४ साली हिंदी चिजांचा मराठी अर्थ समजावून सांगणे ही कल्पनाच क्रांतिकारक होती. इचलकरंजी संस्थानच्या शाळेमध्ये संगीत विभागात त्यांनी स्टाफ नोटेशनचाही प्रयत्न केला होता.

माधव संगीत विद्यालयही अल्पावधीत लोकप्रिय झाले. सर्वश्री गोविंदराव टेंबे, बी. आर. देवधर, रातांजनकर आदि महान संगीतज्ञांनी विद्यालयाबद्दल प्रशंसोद्गार काढले. सुमारे शंभरेक विद्यार्थ्यांनी विद्यालयात प्रशिक्षण घेतले. त्यांपैकी अरविंद मंगरूळकर, माधव इंगळे, ना. वा. दिवाण, सुलभा ठकार (लोणकर) इत्यादींनी संगीताचे कार्य यशस्वीपणे पुढे चालू ठेवले.

पं. भिकुबुवा, पं. गुंडोबुवा व पं. केशवबुवा यांचेनंतर इंगळे घराण्यात पं. माधव हेही गाण्याची परंपरा उत्तम पध्दतीने चालवीत आहेत. सुमधुर, निकोप व तयार गळ्याचे पं. माधव इंगळे हे सध्या पासष्टीत ग्वाल्हेर गायकी स्वतंत्र प्रज्ञेने सांभाळत आहेत. पं. माधव इंगळे यांचे पुत्र श्री. मिलिंद इंगळे सुगम गायनात प्रवीण असून त्यांच्या 'गारवा' व इतर अलबममुळे प्रसिध्दीस आले आहेत. रक्तातच गाणे असण्याचे याहून उत्तम उदाहरण कोणते असू शकेल ?

----- x ----- x -----



इचलकरंजी संस्थानचे दरबार गवई
गुरुवर्य केशव गुंडो इंगळे



सहचर